इचलकरंजी नगरपरिषदेच्या इंदिरा गांधी मेमोरीयल हॉस्पिटलमधील कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांना शासन सेवेत समाविष्ट करुन घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१७/प्र.क्र.२८/ आरोग्य-४,
मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई-४०० ००१,
तारीख: - १७ जानेवारी, २०१८.

वाचा :-

१) **शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक : एमयुपी-२०१५/प्र.क्र.३१०/नवि-१९, दि.३०.०६.२०१६.**
२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.९३/आरोग्य-४, दि.२.०८.२०१७.**
३) **शासन शुध्दीपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.९३/आरोग्य-४, दि.१२.१०.२०१७.**

प्रस्तावना:-

इचलकरंजी नगरपरिषदेचे इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालय सार्वजनिक आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्याचा निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि.२१.०६.२०१६ च्या बैठकीत घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन त्याबाबतचा संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील शासन निर्णय, दि.३०.०६.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. नगर विकास विभागाच्या दि.३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये, सदरहू रुग्णालयातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील रुग्णालयात समावेशन करण्यास आणि वैद्यकीयेत्तर (Non-Medical Staff) कर्मचाऱ्यांना नगर परिषदेच्या सेवेत समाविष्ट होण्याचा विकल्प देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. २.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय (२०० खाटा) या रुग्णालयाकरीता पहिल्या टप्प्यात १५७ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. सदर रुग्णालयामध्ये विकल्प दिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना शासन सेवेत समायोजित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याप्रमाणे पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयातील ६९ कर्मचाऱ्यांपैकी खालील ५३ अधिकारी/कर्मचारी यांना पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन सेवेत सामावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

(१) इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात समावेशन करावयाचे कर्मचारी

अ.क्र.	अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव	पदनाम
१	श्री.विवेकानंद शंकर पाटील	शरीरविकृती चिकित्सक

२	श्री. अशोक तमाण्णा सनदी	अस्थिव्यंग शल्य चिकित्सक
३	श्री. अशोक नामदेव घाटगे	वैद्यकीय अधिकारी
४	श्री. श्रीकांत विश्वनाथ सुर्यवंशी	वैद्यकीय अधिकारी
५	श्री. प्रदिप शाम माने	वैद्यकीय अधिकारी
६	श्री. राजाराम एकनाथ सुर्यवंशी	दंत शल्य चिकित्सक
७	श्री. कुमार आप्पासाहेब कदम	वैद्यकीय अधिकारी
८	श्री. महेश रतन महाडिक	वैद्यकीय अधिकारी
९	श्रीम. रजंना चंद्रकांत शेरखाने (रजंना हिरालाल पांडव)	परिसेविका
१०	श्रीम. वंदना प्रभाकर गायकवाड (वंदना रामचंद्र कानिटकर)	परिसेविका
११	श्रीम. गिता गणेश नागुलपेल्ली (नागमणी राजम्मा शेगुरे)	अधिपरिचारीका
१२	श्रीम. इरा भिमराव निडगुंडे (इरा चन्नाप्पा म्हेतर)	अधिपरिचारीका
१३	श्रीम. हसिना अब्दुलगफार पठाण (हसिना रसूल कोतवाल)	अधिपरिचारीका
१४	श्रीम. प्रभावती दयानंद फगरे (प्रभावती विष्णु पोवार)	अधिपरिचारीका
१५	श्रीम. सिमा दत्तात्रय बुरुटे (सिमा रमेश भागवत)	अधिपरिचारीका
१६	श्रीम. प्रियांका मोहन वायदंडे	अधिपरिचारीका
१७	श्रीम.मृणाल संजय जगताप (मृणाल निशिकांत चोपडे)	अधिपरिचारीका
१८	श्री. दत्तात्रय बाबासो बुरटे	अधिपरिचारीका
१९	श्रीम. अनुजा अविनाश जाधव	अधिपरिचारीका
२०	श्रीम. विद्या प्रकाश कुरणे (विद्या दयानंद बाणेदार)	अधिपरिचारीका
२१	श्रीम. भाग्यश्री भागवत कालेकर (वनिता तुकाराम सकटे)	अधिपरिचारीका
२२	श्रीम. सुरेखा विश्वनाथ कुलकर्णी (सुरेखा पांडूरंग कुलकर्णी)	अधिपरिचारीका
२३	श्रीम. कविता बाळकृण होसिंग (रोहिणी देवीदास कुलकर्णी)	अधिपरिचारीका
२४	श्रीम. वर्षा दादासाहेब आवताडे (वर्षा कृष्णात दळवे)	अधिपरिचारीका
२५	श्रीम. स्वाती अनिल कदम (स्वाती बबन भोसले)	अधिपरिचारीका
२६	श्री. शांताराम पाटिलबा वडितके	अधिपरिचारीका
२७	श्रीम. प्रेमलता वसंत साळवी (प्रेमलता संजय आढाव)	अधिपरिचारीका
२८	श्रीम. संध्या अनंत लंबे (संध्या दत्तात्रय देशमुखे)	अधिपरिचारीका
२९	श्रीम. सुजाता शहाजी घोरपडे (सुजाता राजाराम ठोंबरे)	अधिपरिचारीका
३०	श्रीम. प्रमिला शामकांत सर्वगौडे	अधिपरिचारीका
३१	श्रीम. पुनम बाळकृष्ण मोहिते	अधिपरिचारीका
३२	श्रीम. अंजली मनोहर लोहार (मंगल दत्तात्रय सुतार)	अधिपरिचारीका
३३	श्रीम. आरती शीवप्रसाद बरगे (शुभांगी सुरेश आजगावकर)	अधिपरिचारीका
३४	श्रीम. माधवी संदीप शहा (माधवी गुलाबराव देसाई)	आहार तज्ञ
३५	श्री. समीर रमेश कारेकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ

३६	श्रीम. संगिता बाळकृष्ण कंचकारटी (संगिता बाळकृष्ण मडंले)	प्रयोगशाळा तंत्रज्ञ
३७	श्री. बाबू बापू पाटील	औषध निर्माण अधिकारी
३८	श्रीम. संगिता राजेंद्र भोरे (संगिता शंकर माटेकर)	औषध निर्माण अधिकारी
३९	श्री. प्रमोद शशीकांत शहा	औषध निर्माण अधिकारी
४०	श्री. हणमंत नारायण सिद	औषध निर्माण अधिकारी
४१	श्री. सुरेश माणीक मोरे	औषध निर्माण अधिकारी
४२	श्रीम. शकुंतला महादेव गायकवाड (वंदना लक्ष्मण जाधव)	शिंपी
४३	श्री. विशाल बाळासाहेब आविटकर	दंत आरोग्यक
४४	श्री. धर्मवीर चिमाजी भाकरे	व्रणोपचारक
४५	श्री. हरिश्चंद्र रामचंद्र जाधव	कक्षसेवक
४६	श्री. विजय वसंत माने	कक्षसेवक
४७	श्री. पोपट गजानन सागावे	कक्षसेवक
४८	श्री. बालमहमंद दस्तगीर शिरढोणे	कक्षसेवक
४९	श्री. शशिकांत बंडू नाईक	कक्षसेवक
५०	श्री. सचिन रघुनाथ साळुंखे	कक्षसेवक
५१	श्री. किसन भाऊ मिलखे	शिपाई
५२	श्रीम. वत्सला शामराव कांबळे	कक्षसेवक

(२) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये समावेशन करावयाचे कर्मचारी

अ.क्र.	**अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव**	**पदनाम**
१	श्रीम. कलंदर रमजान अत्तार	सहाय्यक परिचारीका प्रसाविका

१) सदर एकूण ५३ अधिकारी/कर्मचारी यांना दि.१.४.२०१७ पासून पुर्वलक्षी प्रभावाने शासन सेवेत प्रविष्ट झाल्याचे समजण्यात यावे.

२) उपरोक्त दिनांकापासून समावेशित कर्मचाऱ्यांचे शासनाच्या प्रचलित नियमानुसार भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजना, व्यवसाय कर, आयकर व इतर वजाती करण्यात येईल.

३) समावेशनाच्या दिनांकास जे कर्मचारी सेवा प्रवेश नियमातील पूर्व निर्धारीत वयाची अट पूर्ण करीत नाहीत. त्यांना ही अट शिथिल करण्यात यावी.

४) समावेशीत कर्मचारी वृंदानी जात वैधता प्रमाणपत्र, मराठी, हिंदी भाषा परिक्षा, एम.एस.सी.आय.टी. चे प्रमाणपत्र, टंकलेखनाची अर्हता याबाबींची पूर्तता १ वर्षाच्या आत करण्याच्या अटीवर त्यांचे समावेशन करण्यात यावे.

५) ज्या कर्मचारीवृंदाना या पूर्वीपासून महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती) नियम १९८१ लागू आहेत. त्यांच्या मुळ नियुक्तीच्या दिनांकापासून त्यांच्या सेवा, सेवानिवृत्ती वेतन व अन्य सेवा विषयक लाभाकरिता गणण्यात यावी.

६) सदर कर्मचाऱ्यांना दि. १ नोव्हेंबर, २००५ व त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचारीवृंदाना अंशकालीन सेवा निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात यावे.

७) गट-अ, गट-ब व गट-क मधील कार्यरत कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे इचलकरंजी, नगरपरिषद यांनी महालेखापाल, मुंबई यांचेकडे शिल्लकेसह हस्तांतरीत करण्यात यावेत.

८) शासनाच्या प्रचलित नियमानुसार गट-ड मधील कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे कार्यालयीन प्रमुख म्हणजे वैद्यकीय अधिक्षक यांचेकडे महानगरपालिका इचलकरंजी यांनी अंतिम शिल्लकेसह वर्ग करण्यात यावे.

९) सदरील समावेशित कर्मचाऱ्यांच्या सेवा त्या त्या संवर्गात शासन समावेशनाच्या (दि.१.४.२०१७) दिनांकापासून शून्य ज्येष्ठतेवर समाविष्ट करण्यात याव्यात.

१०) समावेशीत कर्मचारीवृंदाना यापूर्वीचा सेवा कालावधी हा शासनाच्या प्रचलित नियमानुसार रजा, आश्वासित प्रगती योजना व अन्य लाभाकरिता, अनुज्ञेय समजण्यात यावा.

११) ज्या अधिकाऱ्यांचे / कर्मचाऱ्यांचे समावेशन करावयाचे आहे, त्यांच्या नियुक्या विहित मार्गाने जाहिरात देऊन, परीक्षा घेऊन / निवड समितीमार्फत निवड झालेल्या असाव्यात.

१२) संबंधीत अधिकारी /कर्मचारी त्या त्या पदाच्या विहित सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र ठरणे आवश्यक राहील.

१३) उपरोक्त अधिकारी/कर्मचारी शासनाच्या बदलीबाबतच्या प्रचलित नियमानुसार बदलीस पात्र राहतील.

इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात कार्यरत असलेल्या उर्वरित १६ कर्मचाऱ्यांबाबतचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

२. सदर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.१३४३/का.१२, दि.३.११.२०१७ व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.४७२/२०१७/व्यय-१३, दि.२२.११.२०१७ अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील आवर्ती खर्च “मागणी क्र.आर-१, २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, (०६) - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनातंर्गत योजना, (०६) (०१)- मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (अनिवार्य) (२२१० ०२२६)” या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेताक २०१८०१०४१६०८२७४०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.01.17 11:35:31 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर,
आयुक्त, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई,
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई,
सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे,
उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर,
जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर,
जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर,
जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर,
मुख्याधिकारी, नगर परिषद इचलकरंजी, कोल्हापूर,
वित्त विभाग (व्यय-१३/ विनियम/वि.सु.-१/आ.पु.क.) मंत्रालय, मुंबई,
नगर विकास विभाग (नवि-१८), मंत्रालय, मुंबई,
सर्व सह सचिव / उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवडनस्ती (आरोग्य- ४).